285

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०५/०३/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,परिपत्रक क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.११/२०२४/ कोषा प्रशा-५, दिनांक ४ मार्च २०२४.

**विषय :-** आर्थिक वर्ष् २०२३-२०२४ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/जिल्हा कोषागार कार्यालये/ उप कोषागार कार्यालये यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. .संकीर्ण २०२४/प्र.क्र.११/२०२४/ कोषा प्रशा-५, दिनांक ४ मार्च २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३०४१७४६०१५२०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.वल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / महिला व बाल अत्याचार प्रतिवंध विभाग / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे

उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये "वित्त विभाग " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

आर्थिक वर्ष २०२३ - २०२४ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण -२०२४/प्र.क्र.११/२०२४/कोषा प्रशा-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ मार्च, २०२४.

**शासन परिपत्रक**

दरवर्षी मार्च महिन्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात पूरक मागणीद्वारे व सुधारीत अंदाजपत्रकाद्वारे विविध विभागांना निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर उपलब्ध झालेला निधी दि. ३१ मार्च अखेर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये येथे देयके सादर करुन खर्च करणे अनिवार्य असल्यामुळे अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये येथे मार्च महिन्यात सादर होणाऱ्या देयकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे ट्रेझरीनेट, बिम्स, बील पोर्टल व सेवार्थ इ. प्रणालींवर ताण येऊन त्यांचा वेग मंदावण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच देयकांची तपासणी करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये येथील अधिकारी / कर्मचारी यांना पुरेसा कालावधी मिळत नाही. याशिवाय उप कोषागार कार्यालय स्तरावर रात्री उशिरा सादर होणारी देयके, बँकेच्या कामकाजाच्या वेळांमुळे पारित करता येत नाहीत. अशा प्रकारे मार्च अखेर उदभवू शकणाऱ्या संभाव्य अडी-अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व क्षेत्रिय कार्यालये, आहरण व संवितरण अधिकारी, तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

**१) दि. ३१ मार्च, २०२४ रोजी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये येथील देयके स्वीकृती व प्रदानाचे काऊंटर उशीरापर्यंत सुरु ठेवणेबाबत :-**

मार्च अखेरीस दि. ३१ मार्च, २०२४ रोजी शासनाचा निधी अखर्चित राहू नये, यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये दि.३१. मार्च, २०२४ रोजी रात्री उशिरापर्यंत चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दिवशी देयके स्वीकृती व ईसीएस / एनईएफटी / सीएमपी / ई-कुबेर (ECS / NEFT / CMP / e-Kuber) प्रदानाची कामे पूर्ण करता येतील.

**२) दि. ३१ मार्च, २०२४ रोजी शासकीय प्रदाने धनादेशाद्वारे करण्यास मंजूरी देणे :-**

दि. ३१ मार्च,२०२४ रोजी रविवार सुट्टीच्या दिवशी ई-कुबेर प्रणालीद्वारे शासनाचे आर्थिक व्यवहार सुरू राहणार असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई, बँकींग विभाग यांचे निर्देश दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ च्या ई-मेल द्वारे प्राप्त झाले आहेत. दि. ३१ मार्च, २०२४ रोजी मुंबई व नागपूर येथील भारतीय रिझर्व्ह बँक, तसेच राज्यातील सर्व भारतीय स्टेट बँक शाखा तसेच शासनाचे आर्थिक व्यवहार हाताळणाऱ्या अन्य बँकाच्या शाखा रात्री उशिरापर्यंत सुरु राहिल्या तरी रात्री १२.०० नंतर बँकांच्या संगणकीय प्रणालीतील दिनांकात बदल होत असल्याने, व्यवहार पुढील दिनांकास नोंदविला जातो. त्यामुळे शासकीय व्यवहारांचे अचूक लेखांकन

Scanned with CamScanner

होण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ च्या ई-मेल द्वारे प्राप्त निर्देशानुसार अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

**२.१) ई-कुबेर कार्यपध्दती प्रदानासंदर्भात अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये यांनी करावयाची कार्यवाही :-**

(अ) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, वरिष्ठ जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर आणि जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला येथे प्रदानासाठी फक्त ई-कुबेर प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अन्य सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये मात्र प्रदानासाठी ई-कुबेर आणि CMP या दोन्ही प्रणालींचा वापर करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, आणि जिल्हा कोषागार कार्यालय स्तरावर ई-कुबेर प्रणालीद्वारे प्रदान करण्याची कार्यवाही दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी आणि सायंकाळी ६.०० नंतर मात्र प्रदानासाठी धनादेश कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

(आ)अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, आणि जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास दि.३१ मार्च, २०२४ रोजी रात्री ८.०० वाजेपर्यंत मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये यांनी करावी.

(इ) तथापि, आहरण व संवितरण अधिकारी यांचेव्दारे दि.३१ मार्च, २०२४ रोजी रात्री ८.०० वाजेपर्यंत ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

**२.२) ई-कुबेर कार्यपध्दती प्रदानासंदर्भात उप कोषागार कार्यालयांनी करावयाची कार्यवाही :-**

(अ) राज्यातील २९ उप कोषागार कार्यालयांमध्ये प्रदानासाठी फक्त ई-कुबेर प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अन्य सर्व उप कोषागार कार्यालयांमध्ये मात्र प्रदानासाठी ई-कुबेर आणि CMP या दोन्ही प्रणालींचा वापर करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर उप कोषागार कार्यालय स्तरावर ई-कुबेर प्रणालीद्वारे प्रदान करण्याची कार्यवाही दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

(आ)उप कोषागार कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास दि.३१ मार्च, २०२४ रोजी रात्री ८.०० वाजेपर्यंत मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा उप कोषागार कार्यालयांनी करावी.

(इ) तथापि, आहरण व संवितरण अधिकारी यांचेव्दारे दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे



Scanned with CamScanner

प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी उप कोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

**२.३) CMP / Fast Plus CMP द्वारे प्रदाने हाताळणाऱ्या कोषागार कार्यालयांनी करावयाची कार्यवाही.**

अ) जिल्हा कोषागार कार्यालय स्तरावर CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे प्रदान करण्याची कार्यवाही दि.३१ मार्च, २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी आणि दुपारी ४.०० नंतर मात्र प्रदानासाठी धनादेश कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

आ) जिल्हा कोषागार कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा जिल्हा कोषागार कार्यालयांनी करावी.

इ) तथापि, आहरण व संवितरण अधिकारी यांचेव्दारे दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

**२.४) CMP / Fast Plus CMP द्वारे प्रदाने हाताळणाऱ्या उप कोषागार कार्यालयांनी करावयाची कार्यवाही.**

अ) उप कोषागार कार्यालय स्तरावर CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे प्रदान करण्याची कार्यवाही दि.३१ मार्च, २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

आ) उप कोषागार कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा उप कोषागार कार्यालयांनी करावी.

इ) तथापि, आहरण व संवितरण अधिकारी यांचेव्दारे दि.३१ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत CMP / Fast Plus CMP प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी उप कोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

**३) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी आक्षेपित केलेली देयके दि.१५ मार्च, २०२४ पूर्वी अधिदान व लेखा कार्यालय मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे फेरसादर करणे :-**

माहे एप्रिल, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी आक्षेपित केलेली देयके आहरण व संवितरण अधिकारी



Scanned with CamScanner

यांचेकडून वर्षाअखेरीस एकदम फेरसादर केली जाऊ शकतात. आर्थिक वर्षअखेरीस अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर केल्या जाणाऱ्या एकूण देयकांचा ओघ पाहाता अशा फेरसादर देयकांची कोटेकोर तपासणी करणे अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथील अधिकारी-कर्मचारी यांना वेळेअभावी शक्य होत नसल्याने त्यात अनियमितता घडू शकतात.

या पार्श्वभूमीवर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी यापूर्वी म्हणजेच माहे एप्रिल, २०२३ ते फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत किंवा त्या पूर्वी आक्षेपित केलेली आणि दिर्घ काळापासून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे फेर सादर न झालेली सर्व देयके संबंधित आहरण व संवितरण अधिकारी दि. १५ मार्च, २०२४ पर्यंतच फेरसादर करु शकतील. दि. १५ मार्च, २०२४ नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत.

**४) काही विशिष्ट प्रकारची देयके दि.१५ मार्च, २०२४ पूर्वी अधिदान व लेखा कार्यालय मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करणे :-**

प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध असलेल्या अनुदानाची खालील बाबींची देयके दि. १५ मार्च, २०२४ पर्यंतच अधिदान व लेखा कार्यालय मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करण्यात यावीत. दि. १५ मार्च, २०२४ नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत. त्यांनतर अशी देयके पुढील वर्षाच्या अनुदानातून काढण्यात यावीत.

१.प्रवास भत्ता देयके.
२. आस्थापना विषयक पुरवणी देयके.
३. वैदयकीय खर्च प्रतिपूर्ती देयके.

तथापि, जर उपरोक्त बाबींसाठी पुरवणी मागण्या (मार्च -२०२४) व सुधारीत अंदाजपत्रकानुसार अनुदान मंजूर झाले असेल, तर मात्र सदर बाबींसाठीची देयके दि १५ मार्च, २०२४ नंतर अधिदान व लेखा कार्यालय मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारण्यात येतील.

**५) प्रपत्र बिजक (Proforma Invoice) जोडून सादर होणा-या देयकांबाबत :-**

मार्च महिन्याच्या अखेरीस उपलब्ध निधी खर्च करण्याच्या हेतूने माल / वस्तू प्राप्त झालेल्या नसताना देखील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्रपत्र बीजक (Proforma Invoice) जोडून म.को.नि.नमूना ३१ अथवा २८ मध्ये देयके सादर केली जातात व ती पारित करणेबाबत संबंधित विभागांकडून अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकाऱ्यांना विनंती / आग्रह केला जातो. वस्तुत: प्रपत्र बीजक हे फक्त संक्षिप्त देयकांसोबत जोडणे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ३०२ व ३०३ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ मधील परिशिष्ट - एक मधील विवरणपत्र - दोन मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठीच संक्षिप्त देयकावर रक्कम काढता येते.



Scanned with CamScanner

या पार्श्वभूमीवर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रपत्र बीजक (Proforma Invoice) जोडून म.को.नि.नमूना ३१ अथवा २८ मध्ये देयके सादर केली असतील, तर अशी देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी पारित करु नये.

पुरवठादारांकडून खरेदी केलेल्या वस्तुंचा पुरवठा करण्यास आला असेल व म.को.नि.नमुना २८ अथवा ३१ सोबत अंतिम देयके/Final Bill/नियमित प्रमाणके/पावत्या जोडल्या असतील तरच अन्यथा परिपूर्ण असल्यास अशी देयके पारित करण्यात यावीत.

**६) जिल्हा कोषागार कार्यालय स्तरावर सादर होणे आवश्यक असणारी देयके उप कोषागार कार्यालय स्तरावर सादर न करणे :-**

सुधारीत अंदाजपत्रक व पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदानातून मोठया रकमेची देयके महसूल विभाग, कृषी विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग इत्यादी विभागांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांकडून तालुका स्तरावर अनुदान वाटप करुन उप कोषागार कार्यालयामध्ये वर्ष अखेरीस सादर केली जातात. उप कोषागार कार्यालय स्तरावर एकच लिपिक व एकच सहायक लेखाधिकारी / उप लेखापाल कार्यरत असल्यामुळे अशा देयकांची छाननी करण्यावर मर्यादा येतात व अनियमितता घडण्याचा संभव असतो. त्यामुळे अशी देयके उप कोषागार कार्यालयात सादर न करता जिल्हा कोषागार कार्यालयामध्येच सादर करण्यात यावीत. उप कोषागार स्तरावरील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना याबाबत लेखी स्वरुपात सूचना देण्यात याव्यात.

**७) उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२४ रोजी सांयकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करुन जिल्हा कोषागारात सादर करणे :-**

उप कोषागार कार्यालयामध्ये प्राप्त होणारी देयके, त्या देयकांवर उप कोषागार कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीस लागणारा अवधी व बँकेच्या कामाचा कालावधी पहाता उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२४ रोजी सांयकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करण्यात येईल. दि. ३१ मार्च, २०२४ रोजी सांयकाळी ६.०० नंतर कोकण भवन, उप कोषागार कार्यालय वगळता इतर उप कोषागार कार्यालयांच्या कार्यकक्षेतील आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांचे जिल्हा स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी यांचे मार्फत जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करावीत. याबाबत सर्व उप कोषागार कार्यालयांमध्ये सूचना फलकाद्वारे सूचना देण्यात याव्यात.

**८) नियंत्रक अधिका-यांनी पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान त्वरीत बिम्स (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध करुन देणे :-**

शासनाकडून विविध विभागांना आठमाही सुंधारीत अंदाजपत्रकानुसार तसेच पुरवणी मागण्यांद्वारे अनुदान मंजूर केल्यानंतर प्रशासनिक विभाग व विभाग प्रमुखांकडून बिम्स (BEAMS) प्रणालीवर उशिराने आहरण व संवितरण अधिका-यांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. त्यानंतर देयके तयार करणे, अधिदान व लेखा कार्यालय मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे देयके सादर करणे, इत्यादी कार्यवाही करण्यास विलंब होतो. वाढीव भारामुळे दि. ३१ मार्च रोजी बिम्स (BEAMS) प्रणाली, बील पोर्टल तसेच ट्रेझरीनेट प्रणाली यावर अतिरिक्त ताण येऊन त्यांचा वेग मंदावण्याचे प्रसंग उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता सर्व विभागांनी / नियंत्रण अधिकारी यांनी सुधारीत अर्थसंकल्प / पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान बिम्स (BEAMS) प्रणालीवर त्वरीत उपलब्ध करुन दयावे.



Scanned with CamScanner

**९) प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे यांनी मार्च महिन्यातील कामकाजाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही :-**

अ. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे कार्यालयांनी माहे मार्च २०२४ मध्ये जिल्हा कोषागार कार्यालयांतील कामकाजाच्या अनुषंगाने शासन तसेच संचालनालय स्तरावरुन प्राप्त होणा-या सुचना, परिपत्रके, शासन निर्णय यांची अंमलबजावणी जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालय यांचेकडून काटेकोरपणे केली जाईल या दृष्टीने नियंत्रण ठेवावे.

आ. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे यांनी त्यांचे अधिनस्त जिल्हा कोषागार आणि उप कोषागार कार्यालयांतील रिक्त पदांचा आढावा घेऊन ज्या जिल्हा कोषागार कार्यालयात आणि उप कोषागार कार्यालयात कामकाज करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे पडत असेल अशा ठिकाणी योग्य ते नियोजन करुन सह संचालक कार्यालयातील अधिकारी - कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

इ. मार्च महिन्यातील कामाचा निपटारा करण्यासाठी जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयांतील अधिका-यांची आढावा बैठक आयोजित करण्यात यावी व त्यानुषंगाने जिल्हा कोषागार कार्यालयांनी मांडलेल्या समस्यांच्या अनुषंगाने नियमोचित मार्गदर्शन करण्यात यावे आणि समुचित उपाययोजना करण्यात याव्यात.

ई. मार्च अखेरीस केल्या जाणा-या कोषागारातील कामकाजावर सह संचालक कार्यालयांमार्फत नियंत्रण ठेवण्यात यावे व त्याचा प्रगती अहवाल संचालनालय , लेखा व कोषागारे कार्यालयास वेळोवेळी सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून,त्याचा संकेतांक २०२४०३०४१७४६०१५२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible]95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=37A42E182BACE4C129A3BEB54E27836D32D40156063 8F644A5478672O5474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2024.03.04 17:56:14 +05'30'

(डॉ.राजेंद्र गाडेकर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४ . सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५ . मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६ . सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य .
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख



Scanned with CamScanner

९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
२९. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई
३०. सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई / पुणे/ नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२. निवड नस्ती कोषा प्र.५



Scanned with CamScanner